## भाषेतील शब्दांचे प्रकार (उत्पत्तीवरून मुख्य)

| सिद्ध शब्द (3) | साधित शब्द (4) |
|---|---|
| तत्सम | 1. उपसर्गघटित (3) |
| 1. तद्भव | 2. प्रत्ययघटित (2) |
| 2. देशी | 3. अभ्यस्त (3) |
| 3. परभाषीय | 4. सामासिक (-) |
| 4. | |

| (3) उपसर्गघटित | प्रत्ययघटित (2) | अभ्यस्त शब्द (3) |
|---|---|---|
| i) संस्कृत उपसर्ग | i) धातुसाधित | i) पूर्णाभ्यस्त |
| ii) मराठी ,, | अ) संस्कृत प्रत्यय | ii) अंशाभ्यस्त |
| iii) फारसी अरबी | ब) मराठी ,, | iii) अनुकरणवाचक |
| | ii) शब्दसाधित | |
| | अ) संस्कृत प्रत्यय | |
| | ब) मराठी ,, | |
| | क) फारसी ,, | |

1) सिद्ध शब्द म्हणजे काय ?
भाषेत जे मुळ धातू किंवा शब्द असतात त्यांना सिद्ध शब्द म्हणतात.
उदा. ये, बस, खा, पी, बोल, जा, कर, उठ, धाव, पळ, झोप इत्यादी

टिप - सिद्ध शब्दातील तत्सम, तद्भव व देशी या शब्दांचा अभ्यास शब्दसिद्धी यात केला जातो.

* शब्दसिद्धी म्हणजे काय ?
शब्द कसा बनतो म्हणजेच सिद्ध होतो त्यास शब्दसिद्धी असे म्हणतात.
उदा. गृह - घर हा शब्द बनलेला आहे.

शब्दसिद्धीचे प्रकार

1) तत्सम - संस्कृत भाषेतील जे शब्द जसेच्या तसे म्हणजे त्यांच्या मूळ रूपात बदल न होता मराठीत आले आहे त्यांना तत्सम शब्द असे म्हणतात.

उदा. गृह, मंदिर, भगवान, ग्रंथ, कवी, मयूर, कुसुम, पिता, फुल, कन्या, वृक्ष, पुरुष, धर्म, सत्कार, सामर्थ्य, उत्सव, पुष्प, जल, प्रिती, पृथ्वी, नदी, विद्वान, निती, पंरतू, मती, अग्नी, कर, स्तर

2) तद्भव - संस्कृत शब्दात बदल करून जे शब्द मराठी भाषेत आलेले आहेत त्यांना तद्भव शब्द म्हणतात.

| तत्सम (संस्कृत) | तद्भव (मराठी) |
| --- | --- |
| गृह | घर |
| पद | पाय |
| भ्रातृ | भाऊ |
| मातृ | माता |
| श्वसृ | सासू |
| श्वसूर | सासरा |
| कोमल | कोवळा |
| शाला | शाळा |
| घर्म | घाम |
| ग्रास | घास |
| आम्र | आंबा |
| ओष्ठ | ओठ |
| दंत | दात |
| नासिका | नाक |
| दुग्ध | दूध |
| ग्राम | गाव |

काही वेळेस अर्थ बदल होऊ शकतो.

उदा.

| तत्सम | तद्भव |
| --- | --- |
| कलश (तांब्या) | कळस (शिखर - मंदिराचे) |
| क्लेश (कष्ट) | किळस (घाण) |

3) देशी - जे शब्द मुळ महाराष्ट्रातील रहिवाश्यांचे आहेत बोली भाषेतील मानले जातात त्यांना देशी शब्द म्हणतात. त्यांची उत्पत्ती सांगता येत नाही. देश्य / देशज असेही म्हणतात.

उदा. झाड, दगड, घोडा, अंघोळ, लुगडे, ढेकून, घोडा, डोळे, डोके, हाड, पोट, गुडघा, बोका, रेडा, पाजरी, बांबो, झोप, खुळा, चिमणी, कंबर, उतरंड, कुवरा, खराटा, चिंच, ओसरी, फटकळ, पीठ, इत्यादी.

4) परभाषीय - संस्कृत सोडून इतर भाषांमधून मराठीत आलेल्या शब्दांना परभाषीय शब्द म्हणतात. याचे दोन उपप्रकार
1) स्वदेशी
2) परप्रांतीय भारतीय भाषेतील शब्द

1) स्वदेशी - कानडी (गुडी, गुंडी, तूप) गाजर कोथिंबीर, अण्णा, अक्का, ताई, भाकरी, तुमची, चिरगुट, किल्ला, पिल्ले, पापड, खलबत्ता, विळी, डोसा, उतप्पा, उसळ, उपीट
गुजराती - हुंडी, दादर, शेठ, घी, डबा, चिकामटेकडा, सदरा, खिडकी
तेलुगु - अनारसा, तिताळी, तिडूकमिडून, शिके, काई,
तमिळ - चिल्लापिल्ली, सार, पठ्ठा, मजेरपाठ
हिंदी - भाई, बेटा, कच्चा, तपास, करोड, दाम, दिल, नाना, नाना इत्यादी